## 'द रवी परांजपे फाउंडेशन' इ-मॅगझीन 'Visual Melody'




८ ऑक्टोबर हा सुप्रसिद्ध जेष्ठ चित्रकार 'श्री. रवी परांजपे' ह्यांचा वाढदिवस. 'द रवी परांजपे फाउंडेशन'तर्फे हा वाढदिवस नेहमीप्रमाणे साजरा न करता ८ ऑक्टोबर २०१९ ह्या दिवशी एका नावीन्यपूर्ण पद्धतीने साजरा केला.

फाउंडेशनचे स्वतःचे इ-मॅगझीन असावे असा विचार रुंजी घालतच होता. हा मनसुबा श्री रवी परांजपे सरांकडे बोलून दाखवला आणि त्यांनी तात्काळ होकार दिला. इतकेच नाही तर प्रथम आवृत्तीसाठी स्वतःच लेख लिहून द्यायची तयारी दर्शविली. त्यामुळे ह्या पहिल्या वहिल्या आवृत्तीची लज्जतच न्यारी झाली. बहुतांश वेळा पहिली आवृत्ती आकर्षक, उत्तम लेख व चित्रे ह्यांनी नटवायला विशेष कष्ट पडतात. पण स्वतः 'श्री. रवी परांजपे सरांनी' ह्या आवृत्तीच्या निर्मितीसाठी विशेष योगदान दिले. अर्थातच आम्ही सर्व फाउंडेशनच्या मंडळींनी ह्या इ-मॅगझीन चे अनावरण 'श्री.रवी परांजपे' सरांच्या वाढदिवशीच करायचे योजले. इ-मॅगझीन चे नावही अगदी योजक आहे, 'Visual Melody'.

मराठी व इंग्लिश ह्या दोन भाषांमधून आवृत्ती निघते.

हे इ-मॅगझीन त्रैमासिक आहे व भविष्यात कला क्षेत्रातील सर्व स्तरांतून लेख, पेंटिंग्ज, देश-विदेशातील कलाविषयक माहितीपूर्ण लेख, प्रदर्शनांची माहिती, विशेष म्हणजे दिग्गज कलाकारांबरोबरच नवोदित कलाकारांना त्यांच्या कलाकृती सादर करण्यास संधी उपलब्ध करणारे असणार आहे. जेष्ठ चित्रकार 'श्री. रवी परांजपे' सर ह्यांच्या दृश्यकलेबाबत असणाऱ्या 'औचित्य आणि सौंदर्य ' ह्या दोन मूलमंत्रावर आधारित ह्या इ- मॅगझीन ची वाटचाल असणार आहे. म्हणूनच जेष्ठ चित्रकार 'श्री रवी परांजपे' सरांच्या वाढदिवसानिमित्ताची विशेष भेट 'दसऱ्याच्या' मुहूर्तावर आम्ही आपल्या सर्वांसाठी घेऊन आलो. ह्याचा आपण जरूर आस्वाद घ्यावा व आपल्या बहुमोल प्रतिक्रिया नक्कीच आमच्या वेबसाईट वर कळवाव्यात. आज २०२० डिसेंबर पर्यंत आमच्या ई मॅगझिनची ५ वी आवृत्ती निघाली आहे. ज्याला आम्ही old masters series म्हणून आत्तापर्यंत प्रकाशित केले आहे. ज्यामुळे नवोदित चित्रकारांना व चित्रकला विषयातील अभ्यासकांना ज्येष्ठ, नावाजलेल्या चित्रकारांची ह्या त्रैमासिकातून वेगळ्याने ओळख होत आहे. अनेक राज्यातून व शहरातून चित्रकार भरभरून प्रतिसाद देत आहेत. ज्याने आम्हाला पुढील आवृतींच्या निर्मितीस नक्कीच उत्तेजन मिळत आहे.

देश विदेशातील सर्व मित्र मंत्रिणींनो जरूर ह्या इ-मॅगझीन चा आस्वाद घ्या.आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवा.

प्रेषक: **सौ. आशा अग्निहोत्री**,
द रवी परांजपे फाउंडेशन

The Ravi Paranjape Foundation for Art, Pune
1 Rutika Apartment, 1098/5-A Model Colony
Shivajinagar, Pune 411016

Office Hours : 10 am to 7 pm
Phone number: Shri. Sanjay Lopes : +91 94054 36175

Visit us for information on new programs:

https://www.facebook.com/theraviparanjapestudio